# जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३६५-२२ | दिनांक ३०/११/२०२२

## अंमली पदार्थाची तस्करी करणा-या आरोपीत विरोधात गुन्हे शाखा कक्ष-3 च्या धडक कारवाईत ५१० ग्राम वजनाचे हेरॉईन जप्त

मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री व तस्करी करणा-या इसमाविरुध्द कडक कारवाई करुन पायबंद करणे बाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय बातमीदार याचे मार्फतीने बातमी मिळवुन दिनांक २९/११/२०२२ रोजी २१.१० वाजता नालासोपारा पुर्व, आचोळे रोड, फायरब्रिगेड जवळील रोडवर ता. वसई, जि. पालघर येथे इसम नामे- संजय सुरेशचंद्र विश्वकर्मा वय - २८ वर्षे, रा. रुम नंबर १०४, साई जनक अपार्टमेंट, रोड नंबर १, अग्रवाल फायरब्रिगेड, आचोळे नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर हा त्याचे कब्जात ५१० ग्रॅम वजनाचे ५१,००,०००/- रु किंमतीची हेरॉईन नावाचा अंमली पदार्थाची हलक्या चॉकलेटी रंगाची पावडर तस्करी करीत असतांना मिळुन आल्याने त्याचेवर कारवाई करण्यात आली.

सदर आरोपी याचेविरुध्द आचोळे पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ५९५/२०२२ एन.डी.पी.एस. कलम ८(क), २१(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास आचोळे पोलीस ठाणे करित आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पो.उपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पो.हवा/ मुकेश तटकरे, पो.हवा/ सागर बारवकर, पो.हवा/ सचिन घेरे, पो.हवा/ शंकर शिंदे, पो.हवा/ मनोज सकपाळ, पो.हवा/ अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, पो.अं./ सुमित जाधव, मसुब/ प्रविन वानखेडे सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.हवा /सुभाष आव्हाड व पोहवा /विष्णुदेव घरबुडे यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

